सकाळ रायगड TODAY
मुंबई, मंगळवार, २ फेब्रुवारी २०२१




**अलिबाग :** उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना दनोरीकर आणि उपस्थित महिला.

# रोजगाराबाबत महिलांसाठी उद्योजकतेवर परिचय शिबिर

अलिबाग, ता. १ : कोरोनानंतर व्यवसायाच्या संकल्पना बदलत आहेत. यामध्ये महिलांसाठी विविध रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. अशा नवउद्योजकतींचा शोध घेण्यासाठी भारतीय उद्योजकता विकास संस्थान व टाटा कम्युनिकेशन, मुंबईद्वारा रोहा येथे उद्योजकता परिचय व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले होते.

द. ग. तटकरे सभागृहात झालेल्या या शिबिरासाठी 'सकाळ' माध्यम प्रायोजक होते. या शिबिरासाठी रोहा तालुक्यातील ६३ महिला सहभागी झाल्या होत्या. लॉकडाऊननंतर स्वयंरोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. या संधीच्या शोधात असलेल्या तालुक्यातील महिलांचा उदंड प्रतिसाद शिबिराला मिळाला.

या वेळी महिला उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये घेण्यात येणाऱ्या विषयाची माहिती भारतीय उद्योजकता विकास संस्था प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी दिली; तसेच साईश्रद्धा फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय राणे यांनी मार्गदर्शन केले. यानंतर प्रशिक्षक आयजॅक मसी यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. या वेळी प्रमुख समाजसेवक व बहुजन युवा संघचे संस्थापक रमेश शिंदे, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे राठोड उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे आभार भारतीय उद्योजकता विकास संस्था प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी मानले. प्रशिक्षणाला बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.